महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125





epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. ७ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११५ किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

आयुष्य हे आशांचे उद्यान आहे; प्रत्येक फुलाचा आनंद लुटा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-६:४३ संध्या-६:३४

## सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६३,७७५/- २,८५,०००/-

## केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# अर्थसंकल्पात उद्योग, रोजगार अन् गुंतवणुकीवर भर

## महाराष्ट्राला ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा रोडमॅप

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्राला विकसित राज्याच्या दिशेने नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६–२७ वर्षाचा अर्थसंकल्प सादर करत मोठ्या योजना जाहीर केल्या. उद्योग, रोजगार, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांवर भर देत राज्याच्या आर्थिक विकासाचा मोठा आराखडा या अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे.**




राज्यातील गुंतवणूक आणि रोजगार वाढवण्यासाठी अनेक मोठे प्रकल्प जाहीर करण्यात आले. रत्ने आणि आभूषणे धोरणाच्या माध्यमातून सुमारे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात येण्याची अपेक्षा असून त्यातून सुमारे ५ लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. तसेच बांबू विकास प्रकल्पाच्या माध्यमातून ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पातूनही जवळपास ५ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ५ ते ७ टक्के बांबू बायोमास वापरण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जीआयएस, एमआयएस, ब्लॉकचेन आणि ड्रोन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांबू मूल्यसाखळी विकसित करण्याची योजना सरकारने आखली आहे. विदर्भातील गडचिरोली जिल्ह्याला औद्योगिकदृष्ट्या विकसित करण्यासाठी मोठी घोषणा करण्यात आली आहे. येथे गडचिरोली स्टील हब उभारण्यात येणार असून त्यासाठी (पान २ वर)

### महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरच्या दिशेने

कोकणातील विकासासाठी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी सुरू असलेली सिंधुरत्न समृद्ध योजना आणखी तीन वर्षे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय कोकण विभागातील साकव बांधणी आणि दुरुस्ती करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. अर्थसंकल्पात राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबतही महत्वाकांक्षी उद्दिष्टे जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून २०४७ पर्यंत ती ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. शेती क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्ज डॉलरवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न १२३ अब्ज डॉलरवरून १५०० अब्ज डॉलरपर्यंत आणि सेवा क्षेत्राचे उत्पन्न ३१२ अब्ज डॉलरवरून ३००० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा सरकारचा मानस आहे.

### ➤ राजकोषीय तूट राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी

**आर्थिक व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही काही महत्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले. सहाव्या राज्य वित्त आयोगाचा अहवाल कृती आराखड्यासह पुढील अधिवेशनात सादर केला जाणार आहे. प्रशासनिक सुधारणा आणि आर्थिक विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. २०२६–२७ या वर्षासाठी एकूण ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. महसुली जमा ६ लाख १६ हजार ९९ कोटी रुपये तर महसुली खर्च ६ लाख ५६ हजार ६५१ कोटी रुपये असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे सुमारे ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तूट अपेक्षित आहे. मात्र राजकोषीय तूट राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश आले असल्याचे सांगण्यात आले.**

# धर्मांतर घडवून आणणाऱ्यांना सात वर्षांचा कारावास

## विधिमंडळाच्या चालू अधिवेशनातच कायदा करणार

वृत्तसंस्था । मुंबई




**राज्यात अमिष दाखवून किंवा फसवणुकीने धर्मांतर घडवून आणणाऱ्यांना आता थेट सात वर्षापर्यंत तुरुंगाची हवा खावी लागणार आहे. प्रलोभनाच्या माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतरापासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी विशेष कायदा करण्याचा निर्णय गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. विधिमंडळाच्या याच अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

राज्यात मध्यंतरीच्या काळात मुस्लिम मुलाने फसवून हिंदू मुलीशी विवाह केल्याच्या ‘लव्ह जिहाद’च्या काही घटना उघडकीस आल्या होत्या. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना प्रलोभने दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडले जात असल्याच्या घटनाही वेळोवेळी उघडकीस आल्या होत्या. राज्यात शिवसेना– भाजप युतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून ‘लव्ह जिहाद’, धर्मांतराच्या घटना रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी हिंदुत्ववादी संघटनांकडून सातत्याने होत होती. याची दखल घेत लोकांच्या धर्म स्वातंत्र्याच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी तसेच एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी विशेष कायदा करण्याचा निर्णय (पान २ वर)

**या कायद्यानुसार बेकायदेशीर धर्मांतराच्या उद्देशाने केलेला कोणताही विधिपूर्वक विवाह न्यायालयात रद्द होऊ शकतो. धर्मांतरातून झालेल्या विवाहानंतर जन्मलेल्या बालकाला आईचा धर्म लागू होईल. ज्याला धर्मांतर करायचे आहे त्याला दोन महिने आधी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागेल. त्यानुसार धर्मांतराबाबतची सूचना प्रसिद्ध होईल. त्यावर कोणी आक्षेप घेतल्यास धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीची पोलीसामार्फत चौकशी करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे धर्मांतर करणाऱ्यास २१ दिवसात धर्मांतराचा सर्व तपशील जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा लागेल. चुकीच्या पद्धतीने झालेले धर्मांतर रद्द करण्याचे अधिकारही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे धर्मांतराविरोधात नातेवाईकांनी तक्रार केल्यास ती नोंदवून घेऊन त्याचा तपास करणे पोलिसांना बंधनकारक करण्यात आले असून धर्मांतराचा गुन्हा अजामीनपात्र ठरविण्यात आला आहे.**

## थोडक्यात




### एमपीएससीची २९ मार्चची परीक्षा लांबणीवर

**मुंबई ।** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या राज्य सेवा मुख्य परीक्षा–२०२५ च्या वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. २७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या मूळ अधिसूचनेनुसार ही परीक्षा २९ मार्चपासून सुरू होणार होती. मात्र, आता ती ५ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी वेळ वाढवून मिळावा, या उमेदवारांच्या मागणीची दखल घेत आयोगाने हे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.



### इंग्लंडला बसली ७४ धावांची ‘पेनल्टी’

**मुंबई ।** टी–२० विश्वचषक २०२६ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडसमोर २५३ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले आहे. या सामन्यात टीम इंडियाच्या फलंदाजांनी ब्रिटीश गोलंदाजांची पळता भुई थोडी केली. मात्र, या मोठ्या धावसंख्येमागे इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकची एक मोठी चूक कारणीभूत ठरली, ज्याची किंमत इंग्लंडला तब्बल ७४ जास्तीच्या धावा देऊन मोजावी लागली.



### लग्न करण्यापूर्वीच दागिने घेऊन नवरदेव फरार

**मुंबई ।** लग्नासाठी तयार केलेले दागिने हिऱ्यांनी सजविण्याच्या बहाण्याने होणाऱ्या नवरदेवाने अडीच लाख रुपयांचे दागिने पळवल्याची घटना गोवंडी परिसरात घडली. याबाबत तरुणीने केलेल्या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. नवरी मुलीला अडीच लाख रुपये किमतीचे दागिने घेऊन भेटण्यासाठी बोलावले. त्या दिवशी दोघेही मुंबई शहरात दिवसभर फिरले. सायंकाळी आरोपीने तरुणीकडून दागिने घेतले आणि दोन दिवसांत हिरे लावून दागिने आणून देतो, असे सांगितले. तरुणीने या भामट्यावर विश्वास ठेवला आणि त्याच्याकडे दागिने सोपवले. दुसऱ्या दिवशी तरुणीने त्याच्याशी फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीचा फोन बंद होता.

### विधानसभा अध्यक्षांचे आदेश...

# विद्यार्थ्यांची बेकायदेशीरपणे वाहतूक करणारी वाहने जप्त करा

वृत्तसंस्था । मुंबई



**राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऑटो रिक्षा, ओमनी, खाजगी वाहनातून कोंबून शाळेत नेले जाते. अनेक वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना भरले जाते. यातून विद्यार्थ्यांचा कोंडमारा होतो. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी कठोर कायदे असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची कबुली शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत दिली. यावेळी सर्वपक्षीय सदस्यांनी परिवहन आणि शिक्षण विभागाच्या कारभारावर ताशेरे ओढले.**

अखेर खाजगी वाहनातून होणारी विद्यार्थ्यांची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी स्वतंत्र परवाने देण्यात यावेत, असे परवाने नसणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करून ती जप्त करण्यात यावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत दिले. याबाबतचा प्रश्न रईस शेख यांनी उपस्थित केला होता. त्यावर संजय मेश्राम , अभिमन्यू पवार आदींनी उपप्रश्न विचारले, परिवहन विभागाशी (पान २ वर)

# हवाई दलाचं सुखोई लढाऊ विमान आसाममध्ये कोसळलं

वृत्तसंस्था । कार्बी आंगलोंग

**भारतीय हवाई दलाचं ‘सुखोई–३० एमकेआय’ हे लढाऊ विमान आसामध्ये बेपत्ता झाल्याची घटना गुरुवारी संध्याकाळी समोर आली होती. ‘सुखोई–३० एमकेआय’ या लढाऊ विमानाचा उड्डाणानंतर काही वेळातच रडारशी संपर्क तुटला होता. त्यानंतर भारतीय हवाई दलाने या घटनेची माहिती एक्सवरून दिली होती. तसेच या लढाऊ विमानाच्या शोधासाठी पथकेही रवाना करण्यात आली होती.**




भारतीय हवाई दलाच्या ‘सुखोई–३० एमकेआय’ या लढाऊ विमानाबाबत आता मोठी माहिती समोर आली आहे. ‘सुखोई–३० एमकेआय’ हे लढाऊ विमान आसाममधील कार्बी आंगलोंग जिल्ह्यात कोसळल्याची घटना घडली आहे. ही घटना घडल्यानंतर आता पुढील शोध मोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती भारतीय हवाई दलाने दिली आहे. भारतीय हवाई दलाने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे की, ‘सुखोई–३० एमकेआय’ हे लढाऊ विमान प्रशिक्षण मोहिमेवर होतं.

मात्र, यावेळी अचानक या लढाऊ विमानाचा उड्डाणानंतर काही वेळात रडारशी संपर्क तुटला. त्यानंतर हे विमान आसाममधील जोरहाटपासून सुमारे ६० किमी अंतरावर असलेल्या कार्बी आंगलोंग जिल्ह्यात कोसळलं आहे. या विमानात दोन वैमानिक होते. त्या वैमानिकाचा देखील शोध घेतला जात होता. मात्र, अपघातात गंभीर जखमी झालेल्या स्क्वाड्रन लेफ्टनंट अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांचा मृत्यू झाल्याची माहिती भारतीय हवाई दलाने एक्सवरून दिली आहे. दरम्यान, या विमानाचा संपर्क नेमकं कशामुळे तुटला? हे हवाई दलाचं लढाऊ विमान कशामुळे कोसळलं? याचा तपास केला जाणार असल्याचं हवाई दलाने म्हटलं आहे. (पान २ वर)

# देशातील २२८५ डॉक्टरांचे भवितव्य अंधारात

## सीपीएसची मान्यता रद्द झाल्याने शिक्षण पूर्ण होऊनही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने साधारणपण दीड वर्षांपूर्वी कॉलेज ऑफ फिजिशियन्स अँड सर्जन्स (सीपीएस) या संस्थेची मान्यता रद्द केली. त्यामुळे या संस्थेमध्ये पदविका पदव्युत्तर शिक्षणासाठी २०२२ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी जवळपास दोन हजार डॉक्टरांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मान्यता रद्द केल्याने परीक्षा घेण्याचे अधिकार नसल्याचे सीपीएसकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे अनुत्तीर्ण झालेल्या या डॉक्टरांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आपली परीक्षा घ्यावी यासाठी हे विद्यार्थी आझाद मैदानात आंदोलनाला बसले आहेत.**



एमडी, एमएस या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना सीपीएसमार्फत राबविण्यात येणारे पदविका अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरत होते. सीपीएस ही संस्था मागील १२० वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण देत आहे. या संस्थेमार्फत महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, मध्य प्रदेश, उडीसा, दादरा नगर हवेली, अंदमान निकोबार या राज्यांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जाते. मुंबईस्थित असलेल्या या संस्थेमध्ये गैरव्यवहार होत असल्याच्या आरोपानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाकडून २०२५ मध्ये सीपीएसची मान्यता (पान २ वर)

शिक्षण पूर्ण करूनही परीक्षा होत नसल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ११ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीवेळी न्यायालयाने लवकरात लवकर परीक्षा घेण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये परीक्षा उत्तीर्ण झालेले डॉक्टर प्रत्यक्ष विविध रुग्णालयांमध्ये काम करत असून ते जवळपास अडीच लाखांच्या आसपास मासिक वेतन घेत आहेत. मात्र आम्ही शिक्षण घेऊनही या विद्यार्थ्यांना त्यापासून वंचित राहावे लागत असल्याची खंत डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# ‘यूपीएससी’ नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२५ अंतिम निकाल जाहीर केला आहे. याची लेखी परीक्षा ऑगस्ट २०२५ मध्ये घेण्यात आली होती, तर मुलाखती डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडल्या होत्या. या दोन्ही टप्प्यांच्या आधारे आयोगाने एकूण ९५८ उमेदवारांची विविध केंद्रीय सेवांसाठी शिफारस केली आहे.**

निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा, भारतीय पोलीस सेवा तसेच केंद्र सरकारच्या गट अ आणि ब सेवांमध्ये केली जाणार आहे.

या वर्षीच्या परीक्षेत अनुज अग्निहोत्री यांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर राजेश्वरी सुवे एम, तिसऱ्या क्रमांकावर आकांश धुल्ल, चौथ्या क्रमांकावर राघव झुनझुनवाला आणि पाचव्या क्रमांकावर ईशान भटनागर यांनी स्थान मिळवले आहे. आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा निवड झालेल्या उमेदवारांमध्ये ३१७ सामान्य प्रवर्गातील, १०४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ३०६ इतर मागासवर्गीय, १५८ अनुसूचित जाती आणि (पान २ वर)

### अनुज अग्निहोत्री देशात प्रथम

**निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाण**

| | |
|---|---|
| सामान्य प्रवर्ग | ३१७ |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल | १०४ |
| इतर मागासवर्ग | ३०६ |
| अनुसूचित जाती | १५८ |
| अनुसूचित जमाती | ७३ |

## संपादकीय

### अणू युद्धाकडे जाण्याचा धोका?

अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर हल्ला केल्यानंतर संघर्ष अधिकच वाढला आहे. गेल्या काही वर्षांत सातत्याने जगातील कोणत्या ना कोणत्या देशामध्ये हस्तक्षेप करून सत्ताबदल घडवण्यासाठी कार्यरत असलेल्या अमेरिकेचे हे धोरण कधी संपणार याबाबत जागतिक पातळीवर कोणताच नेता उत्तर देऊ शकत नाही. जागतिक शांतता नांदावी यासाठी प्रयत्न करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या युनोकडेसुद्धा त्याचे उत्तर नाही आणि युनोच्या विशेष सुरक्षा समितीकडेसुद्धा त्याचे उत्तर नाही. जोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही तोपर्यंत अमेरिकेचे सत्ताधीश सातत्याने जगातील कोणत्या ना कोणत्या देशावर अत्याचार करतच राहणार आहेत. अमेरिकेला अद्यापपर्यंत आपल्या स्वतःच्या भूमीवर युद्धाच्या झळा बसलेल्या नाहीत. अमेरिका नेहमीच इतर देशांच्या भूमीवर जाऊन युद्ध लढत असते. १९६० च्या दशकातील व्हिएतनामचे युद्ध असो किंवा त्यानंतर अफगाणिस्तान, इराक या छोट्या देशात झालेली युद्ध असो, अमेरिकेने नेहमीच दुसऱ्या देशांच्या भूमीचा युद्धासाठी वापर केला आहे. ११ सप्टेंबर रोजी अमेरिकेवर जो मोठा दहशतवादी हल्ला झाला, त्यानंतर जो नरसंहार झाला त्यावेळी अमेरिकेला खऱ्या युद्धजन्य परिस्थितीची जाणीव झाली होती. देशातील सामान्य नागरिकांना युद्धाचा फटका कसा बसतो याचे ज्वलंत उदाहरण अमेरिकेला ९/११ च्या हल्ल्यामुळे मिळाले होते. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानमध्ये जाऊन ओसामा बिन लादेनला खतम केले असले तरी त्यानंतरही अमेरिकेची इतर देशांमध्ये विनाकारण लक्ष घालण्याची रणनीती अद्यापही बदललेली नाही. जे देश अमेरिकेच्या गुड बुक्समध्ये नाहीत. त्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्रास देण्याचे काम अमेरिकेच्या सत्ताधीशांकडून नेहमीच केले जाते. अण्वस्त्र कार्यक्रमांच्या निमित्तानेच अमेरिकेने इराकचे सर्वेसर्वा सद्दाम हुसेन यांना संपवले होते. अण्वस्त्र कार्यक्रमाला विरोध करण्याच्या निमित्तानेच अमेरिकेने उत्तर कोरियाबरोबरही संघर्षाची भूमिका घेतली होती आणि याच भूमिकेतून त्यांनी आता इराणवर हल्ला केला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये जेव्हा लष्करी संघर्ष झाला तेव्हासुद्धा हा संघर्ष अणूयुद्धाकडे जाण्याचा धोका असल्याने आपल्याला त्यामध्ये हस्तक्षेप करावा लागला, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सतत करीत आहेत. म्हणजेच केवळ आण्विक कार्यक्रमाचे निमित्त ठेवून इतर देशांमध्ये हस्तक्षेप करण्याची भूमिका सध्या अमेरिकेकडून सातत्याने घेतली जात आहे आणि दुर्दैवाने इस्त्रायलसारखे देश अमेरिकेच्या पाठीशी उभे राहत असल्यामुळे अनेक छोट्या देशांना त्याचा फटका बसला आहे. जगात सर्वात प्रथम आणि एकमेव अण्वस्त्रांचा वापर अमेरिकेनेच केला होता. आजही अमेरिका सर्वाधिक अण्वस्त्रसज्ज देश आहे. इराणने स्वतःची आण्विक यंत्रणा अत्याधुनिक केली असली तरी त्यांना अण्वस्त्र निर्मिती शक्य झालेली नाही. पण ज्याप्रकारे इराकलासुद्धा याच रणनीतीचा वापर करून अमेरिकेने त्रास दिला होता. त्याच धर्तीवर आता इराणलाही त्रास दिला जात आहे. आपण जागतिक शांततेचे पुरस्कर्ते आहोत या लेबलखाली अमेरिका इतर देशांच्या आण्विक कार्यक्रमांमध्ये हस्तक्षेप करत आहे हे उघड आहे. पण जगातील कोणताही देश त्याला विरोध करताना दिसत नाही. खरे तर दुसऱ्या महायुद्धानंतर आण्विक महायुद्धाचे दुष्परिणाम समोर आल्यामुळे युनोच्या सुरक्षा समितीनेच आण्विक कार्यक्रम हा विषय आपल्या हातात घ्यायला हवा होता. पण आता तर अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे युनोला आणि युनोच्या सुरक्षा समितीलाही विचारत नाहीत. इराणच्या आण्विक कार्यक्रमामुळे त्या प्रदेशातील देशांना विशेषतः इस्त्रायलला मोठा धोका असल्याचे कारण देऊन हा लष्करी संघर्ष सुरू केला आहे.

# पाल्हाबार-कुवलीडाबरदरम्यान साकवचे काम न केल्यास आंदोलन

## अमोनी, रापापूर परिसरातील नागरिकांनी दिला इशारा

प्रतिनिधी । तळोदा

**पाल्हाबार आणि कुवलीडाबर या पाड्यांतील रस्ते आणि साकवचे काम लवकर सुरू झाले नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अमोनी आणि रापापूर परिसरातील नागरिकांनी दिला आहे.**

➤ शासन दरबारी निवेदन देऊन समस्याकडे गांभीयनि लक्ष देत नाही आहे. आमच्या रस्त्यांची समस्या सोडवण्याची विनंती वारंवार करूनसुद्धा प्रशासन आमच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातही साध्य रस्त्यासाठी आणि पुलासाठी वन विभागाच्या दारात खेटा घालत आहेत. अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे विकास खुंटला आहे. अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. पुलाचे काम लवकर सुरू झाले नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही अमोनी आणि रापापूर परिसरातील नागरिकांनी दिला आहे. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत रापापूरचे पदाधिकारी, पाल्हाबार-कुवलीडाबरचे ग्रामस्थ, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनावर सरपंच प्रीतिमा वळवी, उपसरपंच मिथुन पाडवी, विक्रम वळवी, भीमसिंग वळवी, विलास पाडवी आदींच्या सह्या आहेत.

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत रापापूर अंतर्गत येणाऱ्या पाल्हाबार आणि कुवलीडाबर या पाड्यांच्या रस्ते आणि साकव पुलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले हे काम वन विभागाच्या जाचक अटी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे रखडले असल्याचा आरोप करत, ग्रुप ग्रामपंचायत रापापूर व समस्त अमोनी परिसरातील गावकऱ्यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची नंदुरबार येथे भेट घेऊन त्यांना निवेदनाद्वारे साकडे घातले आहे. निवेदनात म्हटले आहे की, पालाबार व कुवलीडाबर हे ग्रुप ग्रामपंचायत रापापूर या ग्रामपंचायतीत येत असून शंभर टक्के आदिवासी समाज असणारी ही लोकवस्ती आमच्या पूर्वजांनी सातपुड्याच्या कुशीत वसवलेली गावपाडे आहेत. परंतु गावकरी पिढ्यानपिढ्या शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत आहोत.

पाड्यांना दळणवळणासाठी रस्ता नाही भारत सरकारच्या इतर वननिवासी व अनुसूचित जनजाती २००६ व सुधारित २०१२ च्या वन हक्क कायद्याप्रमाणे शासनाने ठरवून दिलेल्या वनक्षेत्रात येणाऱ्या गाव पाड्यांच्या भौतिक विकासासाठी १३ बाबीनुसार (३) (२) प्रमाणे गावकऱ्यांनी रीतसर ग्रुप ग्रामपंचायत रापापूरच्या माध्यमातून गाव जोड रस्ता व साकव पूल बांधकाम करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव मेवासी वनविभाग कार्यालय तळोदा येथे जमा केला आहे. परंतु संबंधित वन विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक आमच्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष करून आम्हाला रस्त्यापासून वंचित ठेवण्याच्या प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आम्हाला एखाद्या गावात आजारी व्यक्ती किंवा गरोदर माता असेल तर मुख्य बांबूलेन्सच्या सहाय्याने रस्तापर्यंत आणण्यासाठी खांद्यावर घेऊन जावे लागते. यात रुग्ण किंवा गरोदर माता वेळेवर दवाखान्यात पोहोचवता येत नसल्याकारणाने वेळप्रसंगी जीवाचे बरे वाईट होत असतात तसेच आमच्यापर्यंत विविध सुविधेसाठी येणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना सुद्धा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे आम्हाला आरोग्य, शिक्षण, शालेय पोषण आहार, घरकुल, पाण्याच्या सुविधा आदी शासनाच्या योजनांपासून पिढ्यानपिढ्या वंचित राहावे लागत आहे. काम सुरु न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## धुळे कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला कैदी पसार

प्रतिनिधी । धुळे

खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला कैदी जेल पोलिसांच्या हातावर तुरी देवून पसार झाल्याची धक्कादायक घटना धुळ्यात गुरुवारी सकाळी घडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पसार कैदी भिकन पिंजारी (५४, रा.निफाड, जि.नाशिक) विरोधात धुळे शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पसार कैद्याचा कसून शोध सुरू करण्यात आला आहे.

भिकन पिंजारी या कैद्याविरोधात पिंपळनेर पोलिसात सी.आर. क्रमांक ८९/२०१७ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०२ व ३६३ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल असून त्यास ३० एप्रिल २०२२ रोजी न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

पिंजारी यास शिक्षेनंतर धुळे कारागृहात हलवण्यात आल्यानंतर त्यास गुरुवारी सकाळी कारागृह परिसरातील बावडी बाग येथील शेतीकामासाठी नेमण्यात आल्यानंतर संशयीताने जेल पोलिसांची नजर चुकवून पळ काढला.

विशेष म्हणजे गुरुवारी सकाळी कैदी पसार झाल्यानंतर धुळे कारागृह अधीक्षकांनी धुळे पोलिस अधीक्षकांना घटना घडल्यावर तत्काळ माहिती देणे अत्यंत आवश्यक होते जेणे करून नाकाबंदी आणि इतर उपयोजना करून पसार बंद्याला पकडणे सहज शक्य होते मात्र जेल प्रशासनाने गुरुवारी रात्री आठ वाजता पोलिस प्रशासनाला माहिती दिल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. जेल प्रशासनाचा हलगर्जीपणादेखील या प्रकारातून समोर आला असून या प्रकरणी आता काय कारवाई होते? याकडे लक्ष लागले आहे.

## हमीभाव तूर खरेदी नोंदणीला २४ मार्चपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी । नंदुरबार

खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये नाफेडच्या वतीने सुरू असलेल्या तूर खरेदी प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन तूर नोंदणीसाठी आता २४ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी आर. एस. इंगळे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे. यापूर्वी तूर नोंदणीसाठी २० फेब्रुवारी २०२६ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र, अनेक शेतकरी अद्याप नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने ही मुदत वाढवून दिली आहे.

# नारायणपूर रोड परिसरात चाऱ्याला भीषण आग

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर शहरातील नारायणपूर रोड परिसरात शॉर्टसर्किटमुळे सुका चाराला भीषण आग लागल्याची घटना घडली. मनिष तुलसीराम शर्मा यांच्या मालकीच्या शेतात साठवून ठेवलेल्या सुका चार अचानक पेट घेतल्याने काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले.**



आगीची तीव्रता इतकी होती की संपूर्ण सुकाचा जळून खाक झाला. घटनास्थळी सुकाचाराच्या अगदी शेजारी गायींचा गोठा असल्याने मोठा अनर्थ घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. गोठ्यात पाच गायी आणि एक म्हैस बांधलेली होती. आगीचे रौद्ररूप पाहून परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत जनावरांना तात्काळ सुरक्षित स्थळी हलविले. त्यामुळे संभाव्य जीवितहानी टळली आणि मोठा अपघात टाळण्यात यश आले. घटनेची माहिती मिळताच नगरसेवक उमेश चव्हाण यांनी त्वरित नवापूर नगरपालिकेशी संपर्क साधून अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन बंबचे चालक सलीम पठाण, राजेश गावीत, कैलास गावीत व अल्पेश गावीत यांनी घटनास्थळी धाव घेत अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. त्यांच्या वेगवान कारवाईमुळे आग शेजारील गोठा व इतर मालमत्तेकडे पसरण्यापासून रोखता आली. या आगीत अंदाजे ३ लाख रुपयांचा सुकाचा जळून खाक झाल्याची माहिती शेतमालक मनिष शर्मा यांनी दिली.

प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगितले जात असून संबंधित यंत्रणेकडून पुढील तपास सुरू आहे. आगीमुळे परिसरात काही काळ धुराचे लोट पसरले होते. स्थानिक नागरिकांनी पाण्याच्या बादल्या व उपलब्ध साधनांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आल्याने पुढील धोका टळला.

## पान १ वरून

**धर्मांतर घडवून आणणाऱ्यांना......**

राज्य सरकारने घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने याबाबतच्या कायद्याच्या मसुद्यास मान्यता दिली असून विशेष म्हणजे या कायद्यानुसार धर्मांतराबाबत गुन्हा दाखल झाल्यास अंमलबजावणी आरोपीला आपण निर्दोष असल्याचे सिद्ध करावे लागेल. या कायद्यानुसार कोणतीही व्यक्ती, स्वत: अथवा इथर व्यक्तींशी किंवा संस्थेशी संगनमत करुन अमीष दाखवून, फसवणूकीने किंवा बळजबरीने अन्य कोणत्याही व्यक्तीचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर घडवून आणल्याचे सिद्ध झाल्यास त्याला ७ वर्षापर्यंत कारावास आणि एक लाख रुपये दंडाची शिक्षा होईल. तसेच सामुहिक धर्मांतराच्या गुन्ह्यात ७ वर्षांचा कारावास आणि पाच लाख रुपये दंड तर दोनवेळा गुन्हा करणाऱ्यास १० वर्षे तरुंगवास आणि १० लाख रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**हवाई दलाचं सुखोई......**

हवाई दलाने व्यक्त केल्या संवेदना ?- 'सुखोई-३० एमकेआय' या लढाऊ विमानाच्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या स्क्वाड्रन लेफ्टनंट अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांच्या निधनावर भारतीय हवाई दल शोक व्यक्त करत आहे. भारतीय हवाई दलाचे सर्व कर्मचारी या दुःखाच्या वेळी त्यांच्या कुटुंबासोबत असून आम्ही मनापासून संवेदना व्यक्त करतो', असं भारतीय हवाई दलाने म्हटलं आहे. २०२४ मध्येही सुखोई सु-३० एमकेआय झालं होतं क्रॅश - जून २०२४ मध्ये महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात सुखोई सु-३० एमकेआय बेपत्ता झाल्याची अशीच एक घटना समोर आली होती. दरम्यान, निफाडमधील शिरसगाव गावाजवळ हे विमान कोसळलं होतं. पण, पायलट आणि सह-पायलट सुरक्षितपणे बाहेर पडण्यात यशस्वी झाले होते, अशी माहिती तेव्हा हवाई दलाने दिली होती.

**बेकायदेशीरपणे विद्यार्थ्यांची......**

संपर्क साधून अशा सर्व वाहनांची योग्य निगा राखण्याची, तपासणी करणे, दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे आदी बाबी केल्या जातील, असं उत्तर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आधी दिलं होतं, त्यावर अध्यक्षांनी हस्तक्षेप करत हे निर्देश दिले.

**'यूपीएससी' नागरी सेवा......**

७३ अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांचा समावेश आहे. दोन उमेदवारांचे निकाल रोखून ठेवले तसेच काही उमेदवारांची उमेदवारी तात्पुरती (प्रोव्हिजनल) ठेवण्यात आली असून दोन उमेदवारांचा निकाल रोखून ठेवण्यात आल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

**देशातील २२८५ डॉक्टरांचे......**

रद्द करण्यात आली. या संस्थेच्या दोन वर्षांच्या पदविका पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २०२२ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे २०२४ मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऑक्टोबरमध्ये परीक्षा घेण्यात आली. यात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तज्ज्ञ डॉक्टर म्हणून आरोग्य सेवा बजावत आहेत. तर अनुत्तीर्ण झालेले किंवा काही कारणास्तव परीक्षा देऊ न शकलेले विद्यार्थी मागील दीड वर्षांपासून परीक्षेच्या प्रतीक्षेत आहेत. मान्यता रद्द झाल्याने एप्रिल २०२५ मध्ये नियोजित परीक्षा सीपीएसला रद्द करावी लागली. मान्यता रद्द करण्याच्या निर्णयाला सीपीएसकडून सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मात्र याबाबत कोणताही निर्णय न झाल्याने महाराष्ट्रातील एक हजार डॉक्टरांसह देशातील २ हजार २८५ डॉक्टरांचे भवितव्य अंधारात सापडले आहे.

**अर्थसंकल्पात उद्योग......**

२.६१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या प्रकल्पातून ७० हजार ८९५ रोजगार निर्माण होतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनासाठी ५ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माहिती आणि मनोरंजन क्षेत्रालाही चालना देण्यासाठी मुंबई आणि पुणे येथे ५० अब्ज डॉलर्सचे मीडिया टेक आणि एव्हीजीसी केंद्र विकसित केले जाणार आहेत. यामुळे ३० लाखांहून अधिक रोजगार निर्मिती होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे आणि नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. काही कर आणि नियमांमध्येही बदल - याशिवाय काही कर आणि नियमांमध्येही बदल प्रस्तावित करण्यात आले आहेत. क्रेन आधारित वाहनांवर पूर्वी ७ टक्के प्रमाणे एकरकमी कर आकारला जात होता. मात्र महागडी वाहने इतर राज्यात नोंदवली जात असल्यामुळे या कराची कमाल मर्यादा ३० लाख रुपये ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

## धुळ्यात ९ रोजी डाक अदालतीचे आयोजन

प्रतिनिधी । धुळे

**प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग, धुळे क्षेत्रासंबंधित टपाल सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्याच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल.**

अशा तक्रारींची दखल घेण्यासाठी ९ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता धुळे येथे तिमाही डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. डाक अदालतीत टपाल, स्पीड पोस्ट, काउन्टर सेवा, डाक वस्तू पार्सल, बचत बँक खाते व मनीऑर्डर अशा सेवेबाबतच्या तक्रारींचा समावेश असेल. तक्रारीचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा.

उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविलेली असेल त्याचे नाव व हुद्दा व तक्रार पाठविल्याच्या तपशिलासह संबंधितांनी डाक सेवेबाबतची आपली तक्रार प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग, धुळे ४२४ ००१ यांचेकडे दि.६ मार्च, २०२६ पर्यंत अतिरिक्त प्रतीसह अथवा तत्पुर्वी पोहोचेल अशा बेताने पाठवावी. असेही प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी कळविले आहे.

## महसूल समाधान शिबिरातून ७९ गावांना दिलासा

प्रतिनिधी । मोलगी

**अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा परिसरातील नागरिकांना महसूल कार्यालयाच्या फेऱ्यांपासून मुक्ती देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मोलगी येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरळीत सुरू झाल्यानंतर, तहसीलदार नितीन पाटील यांनी महसूल सेवा जनतेच्या दारी हे धोरण प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात केली आहे.**

यापूर्वी आदिवासी भागातील नागरिकांना सातबारा, उत्पन्न दाखला, रहिवासी प्रमाणपत्र यांसारख्या मूलभूत महसुली कागदपत्रांसाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत होते. प्रवासखर्च, वेळ आणि कामधंद्याचे नुकसान यामुळे जनतेवर मोठा आर्थिक व मानसिक ताण येत होता. मात्र मोलगी येथील अप्पर तहसीलदार पद कायमस्वरूपी भरल्याने हा प्रश्न आता मार्गी लागत आहे. या पार्श्वभूमीवर तीन महसूल मंडळांतील एकूण ७९ गावांसाठी टप्प्याटप्प्याने विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. दि.१० मार्च रोजी वडफळी, दि.१४ मार्च रोजी भगदरी, तसेच दि. १७ मार्च रोजी सरी येथे संबंधित ग्रामपंचायतीच्या मुख्य ठिकाणी ही शिबिरे पार पडणार आहेत. या शिबिरांमध्ये नवीन फेरफार नोंदणी, सातबारा उताऱ्यातील चुका दुरुस्ती, आठ-अ उतारा वाटप, उत्पन्न, रहिवासी व जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर व नॉन ॲग्रीकल्चर परवानगी, सिकलसेल पीडितांसाठी योजना, तुकडेबंदी अधिनियमाशी संबंधित प्रकरणे, विद्यार्थ्यांचे विविध दाखले, मोजणी अर्ज, पीएम किसान योजना, पुरवठा विभागाची प्रकरणे तसेच ग्रामविकासाशी संबंधित सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महसूल सेवा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी तलाठी, ग्रामसेवक व इतर शासकीय कर्मचाऱ्यांना शिबिरस्थळी उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. अल्पावधीतच कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या श्री. पाटील यांच्या या उपक्रमामुळे सातपुड्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शिबिरांव्यतिरिक्त नियमित महसुली व अर्धन्यायिक कामकाज मोलगी येथे नियमितपणे सुरू राहणार आहे.

## होळीतून व्यसनमुक्त समाजाचा संदेश

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील निमगुळ येथील महिलांनी १ मार्च रोजी होळीच्या पूर्वसंध्येला लाकडांची नव्हे, तर समाजाला पोखरणाऱ्या व्यसन आणि दुर्गुणांची होळी करून व्यसनमुक्त समाज निर्मितीचा बुलंद आवाज उठवला आहे. येथील महिलांनी एकत्र येत प्रतिकात्मक रित्या मानवी जीवनाला घातक ठरणारे दारू, गुटखा, तंबाखू, गांजा, सिगारेट यांसारखी व्यसने, तसेच समाजात वाढलेली हिंसा, लैंगिक अत्याचार आणि चंगळवाद यांसारख्या दुर्गुणांची होळी केली.

# भारतीय ज्ञान परंपरेचा अभिमान बाळगा : प्रा.पाटील

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय ज्ञान आणि मूल्य प्रत्येक शतकात त्यावेळीच्या परिस्थिती अनुरूप मार्गदर्शनपर ठरली आहेत, आपण भारतीय ज्ञान परंपरेचा अभिमान बाळगायला हवा, असे प्रतिपादन कला व मानव्यविद्याचे अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे सुरू असलेल्या भारतीय ज्ञान परंपरा आणि जागतिक प्रभाव या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचा समारोप झाला. यावेळी मंचावर पीएमउषाचे समन्वयक प्रा.आशुतोष पाटील, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार, परिषदेचे सचिव डॉ. तुषार रायसिंग आणि परिषदेचे समन्वयक डॉ.विणा महाजन हे उपस्थित होते.

प्रा.आशुतोष पाटील मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढविण्यासाठी आयकेएसचा वापर करून घेता येईल असे सांगितले. संचालक प्रा. राम भावसार यांनी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा आढावा घेतला. केतन वाघ यांनी प्रतिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.सूत्रसंचालन दीपाली माळी आणि इशिका गुप्ता यांनी तर आभार डॉ. तुषार रायसिंग यांनी मानले.

या राष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या प्रथम सत्रात संस्कृत अकॅडमी, हैदराबादचे संचालक डॉ. मधुसुदन पेन्ना यांनी ऑनलाईन भारतीय तत्वज्ञानाची आंतरराष्ट्रीय प्रासंगिकता या विषयावर परिषदेला मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, भारतीय ज्ञान परंपरेत प्राचीनकाळी भाषेचा खोलवर अभ्यास भारतीय तत्त्वज्ञानांनी केलेला आढळतो जो कोणत्याही इतर देशात झालेला दिसत नाही आजही अनेक देशात भारतीय तत्त्वज्ञान अभ्यासले जाते. द्वितीय सत्रात जगदंब महाविद्यालय अचलपूर, वाणिज्य शास्त्राचे प्रा. मयुरेश शिंगरूप यांनी भारतीय ज्ञान प्रणालीचा आढावा आणि जागतिक संदर्भात कौटिल्य अर्थशास्त्राची प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन केले त्यांनी त्यावेळी सांगितले की, प्राचीन ग्रंथसंपदेवर भारतीय ज्ञान परंपरा उभी आहे त्यामुळेच आपल्याला आपली संस्कृतीची माहिती मिळते,असे सांगितले. यावेळी सहभागींनी शोधनिबंधांचे सादरीकरण केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# श्वेतपत्रिकेद्वारे प्रशासकीय राजवटीचा हिशेब प्रसिद्ध करावा

## वैशाली पाटील यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेत लागू असलेल्या प्रशासकीय राजवटीत घेतलेल्या निर्णयांबाबत पारदर्शकता ठेवावी आणि त्या कालावधीतील सर्व आर्थिक व विकासकामांचा सविस्तर लेखाजोखा जनतेसमोर मांडावा, अशी मागणी नगरसेविका वैशाली अमित पाटील यांनी केली आहे. प्रशासकीय कालावधीत नेमके कोणते आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले, निधीचा वापर कसा झाला तसेच विकासकामांची सद्यस्थिती काय आहे? याबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, असे निवेदन त्यांनी बुधवारी मनपा आयुक्तांकडे दिले आहे.**

### ➤ प्रशासकीय निर्णयानंतर पारदर्शकता आवश्यक



**श्वेतपत्रिकेमध्ये आर्थिक, तांत्रिक, प्रशासकीय व कायदेशीर सर्व पैलूंचा समावेश करून पारदर्शकतेचे उच्चतम निकष पाळले जावेत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सुदृढ प्रशासनासाठी व नागरिकांचा विश्वास दृढ करण्यासाठी ही बाब अत्यंत आवश्यक व समयोचित आहे. आपण या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी.**

**- वैशाली पाटील**
नगरसेविका, मनपा जळगाव

आयुक्तांकडे देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महानगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यानंतर लागू करण्यात आलेल्या प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत महानगरपालिकेचा संपूर्ण कारभार प्रशासकीय पातळीवर चालविण्यात आला. सदर कालावधीत विविध प्रशासकीय, आर्थिक, धोरणात्मक व विकासकामांशी संबंधित महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले असल्याची माहिती उपलब्ध आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार हा लोकशाही तत्त्वांवर आधारित असून जनतेच्या निधीचा उपयोग, त्यावरील निर्णयप्रक्रिया व अंमलबजावणी ही पूर्णपणे पारदर्शक, उत्तरदायी व नोंदवहीत अधोरेखित असणे अत्यावश्यक आहे.

सदर प्रशासकीय कालावधीत महानगरपालिकेचा एकूण मंजूर अर्थसंकल्प, प्रत्यक्ष झालेला खर्च, महसूल वसुलीची स्थिती, राज्य व केंद्र शासन अनुदानाचा वापर, कर्ज व्यवहार, तसेच प्रलंबित देयके यांचा सुस्पष्ट व लेखापरीक्षेत तपशील जनतेसमोर येणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्या कालावधीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्यात आलेली विकासकामे, त्यांची अंदाजित किंमत, टेंडर प्रक्रिया, निविदा अटी, कंत्राटदार निवड, कामांची सद्यस्थिती व वेळवाढीची कारणे, यांचा अधिकृत व सुसंगत आढावा उपलब्ध होणे गरजेचे आहे.तसेच, सदर कालावधीत मालमत्ता विक्री, भाडेपट्टा, विकास आराखड्यातील बदल, करदर वाढ अथवा नवीन करनिर्धारण, सार्वजनिक-खाजगी भागीदारीतील निर्णय, मनुष्यबळ भरती किंवा कंत्राटी नियुक्त्या, तसेच न्यायालयीन प्रकरणे व आर्थिक दायित्वे यासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा वस्तुनिष्ठ व दस्तऐवजीकरण केलेला आढावा नागरिकांना समजणे आवश्यक आहे.

# उपमहापौर मनोज चौधरी यांची पिंप्राळा स्मशानभूमीला भेट

## शेड व वॉचमन खोली बांधण्याचे उपमहापौरांचे निर्देश



प्रतिनिधी । जळगाव

**उपमहापौर मनोज चौधरी यांनी पिंप्राळा येथील स्मशानभूमीला भेट देऊन तेथील परिस्थिती आणि आवश्यक सोयीसुविधा यांची पाहणी केली. त्यानंतर आढळून आलेल्या त्रुटी आणि आवश्यक उपाययोजना यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.**

संपूर्ण पिंप्राळा उपनगर तसेच सभोवतीच्या अनेक वस्ती- कॉलनी भागात अंत्यसंस्कारासाठी पिंप्राळा स्मशानभूमी ही जवळची व सोयीची आहे. मात्र देखभाली अभावी ही स्मशानभूमी अनेक समस्यांनी ग्रस्त झालेली असल्याची तक्रार पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचली होती. त्यानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आदेश दिल्याने उपमहापौरांनी गुरूवारी सकाळी या स्मशानभूमीला प्रत्यक्ष भेट दिली. नगरसेवक नरेंद्र पाटील, अमर जैन, कविता सागर पाटील, कविता शिवदे, जाकीर पठाण, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष तुषार सावंत, विजय चौधरी यांच्यासह अनेक नागरिक, कार्यकर्ते आणि संबंधित मनपा अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## थोडक्यात

### जळगावात ११ मार्चला डाक अदालतीचे आयोजन

**जळगाव ।** अधीक्षक डाकघर, जळगाव यांच्या वतीने पोस्टाच्या सेवेसंदर्भातील प्रलंबित तक्रारींच्या निवारणासाठी ११ मार्च रोजी दुपारी ४ वाजता अधीक्षक डाकघर कार्यालय, हेड पोस्ट ऑफिस बिल्डिंग, जळगाव येथे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. टपाल, स्पीड पोस्ट, पार्सल, काउंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर आदी सेवांबाबत सहा आठवड्यांत निराकरण न झालेल्या तक्रारींचा या डाक अदालतमध्ये विचार करण्यात येणार आहे. संबंधितांनी आपल्या तक्रारी दोन प्रतीत अधीक्षक डाकघर कार्यालय, हेड पोस्ट ऑफिस बिल्डिंग, जळगाव - ४२५००१ या पत्त्यावर दि. ९ मार्च २०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा प्रकारे पाठवाव्यात.

### मू.जे. महाविद्यालयात आज राष्ट्रीय परिषद

**जळगाव ।** येथील मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.७ मार्च रोजी करण्यात आले आहे.

या वेळी देशभरातील विविध क्षेत्रातील संशोधक, अभ्यास या ठिकाणी आपल्या संशोधन पेपरचे सादरीकरण करतील. या एकदिवसीय परिषदेत प्रामुख्याने कृत्रिम बुद्धिमत्ता व तिचे विविध क्षेत्रावर होणारे परिणाम यावर प्रकाश टाकण्यात येईल. त्यामध्ये बँकिंग, शिक्षण , अर्थशास्त्र या विषयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे काय परिणाम होऊ शकतात, त्यासंबंधी संशोधक विद्यार्थी त्यांचे रिसर्च पेपर सादर करतील उपस्थितीचे आवाहन प्राचार्य डॉ. संजय भारंबे, उप प्रा. डॉ. सुरेखा पालवे यांनी केले आहे.

# तुती लागवड, रेशीम उत्पादनवाढीसाठी जनजागृती रथाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन



प्रतिनिधी । जळगाव

**राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या महा-रेशीम अभियान २०२६ अंतर्गत तुती लागवड वाढवून रेशीम उत्पादनाला चालना देण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय यांच्या मार्फत जनजागृतीसाठी रेशीम रथाच्या माध्यमातून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येणार आहे.**

या रेशीम रथाचे उद्घाटन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे करण्यात आले. या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मंजुषा घाटगे , जिल्हा रेशीम अधिकारी राकेश जोशी, जळगाव तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी घुगे यांनी प्रत्येक तालुक्यात शिबिरे व शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून सुरू असलेल्या महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून तुती लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना दिले. तसेच रेशीम शेतीचे महत्त्व, तुती लागवड वाढविणे आणि त्याद्वारे रेशीम उत्पादनात वाढ कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी यांनी रेशीम लागवड व संबंधित शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले. रेशीम रथाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना रेशीम शेती, तुती लागवड तसेच उपलब्ध शासकीय योजनांबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# जळगाव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक श्रवणदिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**जागतिक श्रवण दिनानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथे ३ मार्च रोजी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला.**




याप्रसंगी अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर यांनी मूक-बधिर व श्रवणदोष असलेल्या मुलांच्या पालकांशी थेट संवाद साधला. श्रवणदोषाचे वेळेत निदान, योग्य उपचार आणि नियमित पुनर्वसन केल्यास मुलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडू शकतो, असे मार्गदर्शन त्यांनी पालकांना केले. श्रवण आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला डॉ. अक्षय सरोदे सर (सहयोगी प्राध्यापक, कान-नाक-घसा विभाग), डॉ. ललित राणे सर (सहाय्यक प्राध्यापक), डॉ. इम्रान पठाण (अतिरिक्त वैद्यकीय अधीक्षक), डॉ. विनोद पवार, डॉ. शब्बीर राजा, मुनझ्झा शेख (ऑडिओलॉजिस्ट) उपस्थित होते.

चित्रकला स्पर्धा आणि आनंदोत्सव

कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी आयोजित केलेली चित्रकला स्पर्धा. मुलांनी आपल्या कल्पकतेने कागदावर रंग भरत या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मुलांना मिठाई वाटप करण्यात आली. ज्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. केवळ उपचारच नव्हे, तर अशा मुलांना समाजात मानाचे स्थान मिळावे आणि त्यांच्या पालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमातून श्रवण आरोग्याविषयी जनजागृती करण्याचा आणि मुलांना प्रोत्साहन देण्याचा यशस्वी संदेश देण्यात आला.

# जिल्ह्यातून ६ सराईत गुन्हेगार वर्षभरासाठी हद्दपार

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठी कारवाई करण्यात आली आहे. गुन्हेगारी प्रवृत्तींवर वचक निर्माण करणारी ही कारवाई असून वारंवार गुन्हेगारी कृत्यांमुळे शांतता भंग करणाऱ्या ६ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. याबाबत उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आदेश जारी केले आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे.**




### ➤ या ६ सराईतांना केले हद्दपार

**हद्दपार कारवाई अंतर्गत जामनेर तालुक्यातील फत्तेपूर येथील सुनील पांडुरंग पारधी व विजय पांडुरंग पारधी, जळगावातील हरिविठ्ठल नगरातील अमोल ऊर्फ चिक्या शंकर कोकाटे, पिंप्राळा येथील महेंद्र ऊर्फ दादू समाधान सपकाळे, उमेश ऊर्फ उमाकांत दत्तात्रेय धोबी तसेच नशिराबाद येथील फिरोजशहा नूर शहा अशांवर कारवाई करत त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे.**

जिल्ह्यात सध्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अशात कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहे.

यात पोलीस अधीक्षक कार्यालयातर्फे विशेष मोहीम राबवण्यात येत असून या अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांकडून सराईत गुन्हेगारांविरोधात हद्दपारीचे प्रस्ताव पाठवण्यात आले होते. या प्रस्तावांवर सुनावणी घेतल्यानंतर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ व ५७ अंतर्गत ही कठोर कारवाई करण्यात आली.

## वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यातील शाळांच्या वेळापत्रकात बदल

# शाळा ९ मार्चपासून सकाळच्या सत्रात भरवण्यात येणार

प्रतिनिधी । जळगाव

**मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच राज्यातील तापमानात वाढ झाली असून त्यात जळगाव शहरासह जिल्ह्याचा पारा झपाट्याने वाढत आहे. मार्चच्या पहिल्याच आठवड्यात तापमानाचा पारा ४० अंशावर पोहचला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत आहे. वाढत्या तापमानात विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेताला आहे. या निर्णानुसार, शाळांच्या वेळेत बदल करण्याचा आला आहे.**



जि.प. शिक्षण विभागाचे माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दि.९ मार्चपासून सकाळच्या सत्रात भरवण्यात येणार आहे. हा निर्णय सीबीएससी शाळा वगळता सर्व इंगजी माध्यमाच्या शाळांसाठीही लागू असेल. दरवर्षी तापमानाबाबतीत जळगाव जिल्हा कायम चर्चेत असतो. नागपूरनंतर सर्वात जास्त तापमानाची नोंद जळगावात होते. अशात उन्हाळ्याच्या सुरुवातीलाचा जिल्ह्याचा पारा सातत्याने चढत असून उष्णतेचा त्रास वाढला आहे. वाढत्या तापमानात उष्माघाताचा धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शिक्षक संघटनांनी देखील मागणी केली होती. या मागणीचा विचार करून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळून हा मार्ग काढण्यात आला आहे.

**➤ ज्या शाळा आधीच दोन सत्रांमध्ये सुरू आहेत. त्यांच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शाळा सकाळच्या सत्रात भरवल्या जात असल्या तरी माध्यमिक शाळा संहिता नियम ५४.२ नुसार शिकवण्याचे तास कमी होणार नाही. नियमानुसार, दररोज किमान चार तास प्रत्यक्ष अध्यापन अनिवार्य राहील,असेही आदेशात म्हटले आहे.**

# जळगाव आरटीओच्या नवीन फिटनेस-लायसन्स टेस्ट ट्रॅकवर सुविधा मिळाव्या

## प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश वर्मा यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरापासून सुमारे ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या आरटीओ विभागाच्या वाहन फिटनेस टेस्टिंग ट्रॅक आणि पक्के लायसन्स चाचणी ट्रॅकवर सध्या नागरिकांना अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी मनसेने केली आहे.**



या मागणीचे निवेदन प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश वर्मा यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेना पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिले. जळगाव जिल्ह्यात सध्या उन्हाचा कडाका मोठ्याप्रमाणावर वाढत असून, उष्णतेची लाट जाणवत आहे. अशा परिस्थितीत या ट्रॅकवर दररोज शेकडो वाहन चालक आणि नागरिक आपल्या कामासाठी येतात. मात्र, त्या ठिकाणी मूलभूत सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे. ट्रॅकवर येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. कोणतीही सोय नाही. शहरापासून लांब असल्याने वाहन चालकांसाठी सावलीत बसण्याची कोणतीही वेटिंग शेड उपलब्ध नाही. कडक उन्हात तासन्तास उभे राहिल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तरी प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन येत्या ८ दिवसांत या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, ट्रॅकवर त्वरित पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, नागरिकांना बसण्यासाठी प्रशस्त आणि सावलीची शेड उभारण्यात यावी, तातडीने फिरते किंवा कायमस्वरूपी स्वच्छतागृह उपलब्ध करून द्यावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश वर्मा यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड.जमील देशपांडे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, राजेंद्र निकम, ललित शर्मा, खुशाल ठाकूर, युसुफ खाटीक, अश्फाक शहा, आली खाटीक, यांच्यासह मनसे पदाधिकारी यांनी दिले.

# वरणगावात अतिक्रमणावर पालिकेची मोठी कारवाई

## तिरंगा सर्कल-रेल्वे स्टेशन मार्ग, मुक्ताईनगर रस्त्यासह गावातील मुख्य मार्ग मोकळा

प्रतिनिधी । वरणगाव,

**शहरातील वाढत्या अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीवर अखेर नगरपरिषद प्रशासनाने गुरुवारी मोठी कारवाई केली. तिरंगा सर्कल चौक ते रेल्वे स्टेशन रोड, मुक्ताईनगर रस्ता तसेच गावात जाणाऱ्या मुख्य मार्गांवर अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. पोलिस बंदोबस्तात झालेल्या या कारवाईदरम्यान अनेक ठेले, टपऱ्या, शेड, फलक (बोर्ड) तसेच इतर साहित्य जाम करण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील मुख्य रस्त्यांवर फेरीवाले, हातगाड्या आणि टपऱ्यांचे अतिक्रमण मोठ्याप्रमाणात वाढले होते.**




दुकानांसमोर उभ्या राहणाऱ्या हातगाड्या आणि रस्त्यावरच सुरू असलेल्या व्यवसायामुळे रस्ते अरुंद होत चालले होते. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः शाळा सुटण्याच्या वेळेस तिरंगा सर्कल ते रेल्वे स्टेशन रोड या मार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते. या पार्श्वभूमीवर वरणगाव नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा दि.१३ फेब्रुवारी रोजी पार पडली होती. या सभेत शहरातील वाढत्या अतिक्रमणावर कठोर कारवाई करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला होता. त्या ठरावानुसार गुरुवारी सकाळी ११ वाजेपासून नगरपरिषद प्रशासनाने प्रत्यक्ष अंमलबजावणी करत अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू केली.


नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरील अतिक्रमणे हटवली. यावेळी अनेक अतिक्रमणधारकांचे बोर्ड, ठेले, टपऱ्या, शेड, पाल तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. काही अतिक्रमणधारकांनी प्रशासनाच्या कारवाईपूर्वीच स्वतःहून अतिक्रमण काढून सहकार्य केल्याचेही दिसून आले. दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने कोणताही पक्षपात न करता सर्वांवर समान कारवाई करावी, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. पालिका प्रशासनाने तोंड पाहुन काम न करता शहरातील सर्व अतिक्रमणे हटवावीत, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

नगरपरिषद प्रशासनाने ही मोहीम पुढेही सातत्याने सुरू ठेवली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शहरातील रस्ते मोकळे ठेवण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अतिक्रमणाविरुद्ध कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर काही प्रमाणात मोकळीक निर्माण झाली असून नागरिकांनी प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे. हे चांगले आहे, मात्र काही ठराविक ठिकाणी अतिक्रमण सोडून दिल्याची चर्चा आहे.

**ही कारवाई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रविंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी अधिकारी राजुसिंग चव्हाण, आरोग्य विभागाचे दीपक काळे, गणेश कोळी, पाणीपुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर पवार, संजय माळी, राजू गायकवाड, महेंद्र मोरे, मनोज उजलेकर, गोमा भोई, गणेश सपकाळे, कमलाकर सुरवाडे, गोपाळ पाटील, भारत पवार, अशोक साबळे, लिलाधर कोळी, सोपान साबळे, सुनील भोई, श्रीराम माळी यांच्यासह पालिका प्रशासनाचे सुमारे ४० कर्मचारी व वरणगाव पोलीस या अतिक्रमण मोहिमेत सहभागी झाले होते. ठरावीक ठिकाणी अतिक्रमण सोडल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.**

काही ठिकाणी सिमेंटचे अतिक्रमण असूनही त्यावर कारवाई झाली नाही. मात्र रोज नगरपालिकेची पावती फाडणाऱ्या लहान व्यावसायिकांवरच कारवाई करण्यात आली, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ पप्पू ठाकरे यांनी व्यक्त केली. स्टेशनचे एपीआय अमितकुमार बागुल, सहायक फौजदार नागेंद्र तायडे, पोका संदीप वाघ, गृहरक्षक दलाचे राम चौधरी आदी उपस्थित होते.

# स्थानिक सुरक्षा रक्षकांनाच कामावर ठेवण्यासाठी निवेदन



प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ अंतर्गत ४०० केव्ही खडका, दीपनगर ४०० केव्ही व मंडळ कार्यालय खडकावरील कामगार (सुरक्षा रक्षक) महापारेषण मंडळ ४०० केव्ही याठिकाणी मागील १८ वर्षापासून बाह्यस्त्रोत तत्वावर सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असून महापारेषण कंपनीच्या प्रशासनाने २०२६-२७ पासून सुरक्षा रक्षकाच्या सेवा सुरक्षारक्षक मंडळाकडून (बोर्ड गार्ड)घेणार असल्याचे समजते. यामुळे आम्ही बेरोजगार होणार आहे. यावर विचार करावा, असे निवेदन अभियंतांना सुरक्षारक्षकांतर्फे देण्यात आले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, आम्ही बाह्यस्रोत सुरक्षारक्षक म्हणून मागील १८ वर्षापासून कार्यरत असून आमचे नोकरीचे वय उलटुन गेलेले आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीच्या प्रशासनाने २०२६-२७ पासून सुरक्षारक्षकाच्या सेवा सुरक्षारक्षक मंडळाकडून (बोर्ड गार्ड) घेतल्या तर आम्हाला इतरत्र नोकरी मिळणे शक्य नाही. सुरक्षारक्षक मंडळांतर्गत सेवा देण्यासाठी आवश्यक असणारे वयाचे व शारिरीक क्षमतेचे निकष आम्ही पूर्ण करू शकत नाही, त्यामुळे आमच्यापुढे बेरोजगारीचे संकट उभे राहील.

आम्ही सर्व खडका अंतर्गत /भुसावळ येथील स्थानिक रहिवासी आहोत. स्थानिकांना रोजगार मिळावा या चांगल्या उद्देशाने आपल्या स्थानिक लेव्हलवर निविदा आम्ही कोणत्याही एजन्सीमध्ये काम करण्यास तयार आहे. तरी सुरक्षारक्षक मंडळाला दिलेली ऑर्डर रद्दबादल करावी, स्थानिक कामगारांच्या रोजगाराचा व त्याच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहचा विचार करावा, तसेच स्थानिक सुरक्षा रक्षकांना न्याय मिळाला नाही तर सुरक्षा रक्षक बेरोजगार होतील, असेही पत्रकात म्हटले आहे.

## थोडक्यात

### शहरात आज नारी सामर्थ्याची नवी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

**जळगाव ।** हिंदु जनजागृती समितीप्रणीत 'रणरागिणी' शाखेतर्फे जळगाव शहरात 'नारी सामर्थ्याची नवी पहाट' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांनी स्वसंरक्षण आणि आपल्या संस्कृती प्रती जागृत व्हावे, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला जळगावमधील जास्तीत जास्त रणरागिणींनी उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारतीय सैन्यात देशसेवा बजावलेल्या मेजर मैत्रेयी दांडेकर आणि 'आयर्नमॅन' माहेश्वरी सरनोबत उपस्थित राहणार आहेत.

# संशयास्पद वाहनाविरूध्द गुन्हा दाखल

प्रतिनिधी । अमळनेर

**रात्रीच्या गस्तीवर नाकाबंदी करत असतानाही वाहन न थांबवता संशयास्पद वेगाने पुढे नेणाऱ्या वाहनाविरुद्ध अमळनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



दि.३ मार्च रोजी पैलाड नाक्यावर पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, होमगार्ड विशाल चौधरी गस्त करत असताना नियंत्रण कक्षाकडून नाकाबंदी करण्याचे आदेश दिले.

४ रोजी पहाटे पोलीस उज्ज्वलकुमार म्हस्के, अशोक कुमावत व होमगार्ड पाटील आणि मराठे हे देखील नाकाबंदी करायला आले. त्याचवेळी एम पी ०४ जी बी ३७७२ हे पिकअप व्हॅन आली.

तपासण्यासाठी चालकाला थांबवण्याचा इशारा दिला. शिट्टी वाजली तरी तो वेगात धरणगावकडे निघून गेला. पो. कॉन्स्टेबल सुनील पाटील यांनी फिर्याद दिल्यावरून वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून हेडकॉन्स्टेबल गणेश पाटील तपास करीत आहेत.

# हातगाव येथे दारुबंदीचा ग्रामसभेत ठराव

प्रतिनिधी । चाळीसगाव

तालुक्यातील हातगाव येथे संपूर्ण दारूबंदी लागू करण्याची मागणी ग्रामसभेत ठरावाद्वारे करण्यात आली आहे. याबाबतचे हातगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अधिकृत पत्र पाठवण्यात आले आहे. हातगाव ग्रामपंचायत येथे ग्रामसभेत सभेत ठराव (क्र. १०/१) पारित करुन, गावात विक्री होणारी देशी, विदेशी तसेच गावठी हातभट्टी दारू पूर्णपणे बंद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वी २६ जानेवारीला झालेल्या ग्रामसभेतही यासंदर्भात ठराव केला होता. ग्रामपंचायतीच्या पत्रात, गावातील सामाजिक वातावरण, युवकांचे भविष्य आणि कायदा-सुव्यवस्थेचा विचार करून दारूबंदीची अंमलबजावणी करावी, अशी ग्रामस्थांची एकमुखी भूमिका आहे. यासंदर्भात पोलीस निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यास प्रत पाठवण्यात आली आहे. आता दारूबंदीसाठी संबंधित विभागाच्या कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे.

# नाहाटा महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे सीए अभ्यासिकेचे उद्घाटन

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील भुसावळ कला विज्ञान आणि पु.ओ नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे सीए, सीएस, सीएमए करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सीए अभ्यासिकेचे उद्घाटन नुकतेच महाविद्यालयातील डी-५३ या वर्गात वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, सीए अर्पित काबरा (सीसीएमआय, सीएआय, न्यू दिल्ली) यांच्या हस्ते झाले.**



येत्या १९ तारखेपासून ही अभ्यासिका सीए, सीएस, सीएमएच्या विद्यार्थ्यांसाठी खुली होणार आहे. प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव उपप्राचार्य डॉ.जी.आर. वाणी यांनी केले. सूत्रसंचालन माजी विद्यार्थी संघटनेचे सहसचिव डॉ. चंद्रकांत सरोदे यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. दीपक पाटील यांनी मानले. उपक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष डॉ.आशिष चौधरी, कोषाध्यक्ष प्रा.हर्षल पाटील, डॉ.गौरी पाटील, प्रा.स्मिता बेंडाळे, प्रा.स्वाती शेळके, प्रा.डॉ. सचिन येवले, प्रा. कौस्तुभ पाटील, प्रा. भूपेंद्र बाणाईत, मुकेश फिरके, भगवान तायडे, सचिन पाटील तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

अध्यक्षस्थानी तापी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आणि माजी विद्यार्थी संघटनेचे सल्लागार डॉ.मोहन फालक तर प्रमुख उपस्थिती सीए हितेश आगीवाल (चेअरमन डब्ल्यूआयआरसी जळगाव), सीए मुकेश अग्रवाल (भुसावळ), महेश फालक (संस्था चेअरमन), विष्णू चौधरी (सचिव), संजय नाहाटा (कोषाध्यक्ष), प्राचार्य डॉ. बी.एच. बऱ्हाटे, उपप्राचार्य डॉ. दीपक पाटील, उपप्राचार्य तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव डॉ.जी.आर. वाणी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.वाय.एम. पाटील, पर्यवेक्षिका प्रा.स्वाती पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा.प्रशांत पाटील होते. यावेळी उद्घाटक ना. संजय सावकारे यांनी आपल्या उद्घाटनपर मनोगतात, विद्यार्थ्यांना सीए या व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घ्यावा आणि आयसीएआय या संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या वाचनालयाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी मार्गदर्शनात सीए हे, उद्योजक, व्यावसायिकांना व प्रत्येक उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्तींसाठी महत्त्वाचे आहे. उत्पन्नाचे योग्य नियोजन, बचत, गुंतवणूक संपत्तीचे नियोजन, कर नियोजन इत्यादीसाठी समाजात सीए यांचे मार्गदर्शन हे महत्वाचे ठरते, असे सांगितले. यानंतर सीए अर्पित काबरा, सीए हितेश आगीवाल, सीए मुकेश अग्रवाल, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. प्रशांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मोहन फालक यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की. माजी विद्यार्थ्यांचे नेहमीच सहकार्य महाविद्यालयास असते. माजी विद्यार्थ्यांचे कार्य हे कौतुकास्पद असून त्यांनी आपले कार्य असेच चालू ठेवावे त्यासाठी त्यांना काही मदत लागल्यास नक्कीच देऊ, असे आश्वासन दिले आणि आयसीएआय या संस्थेतर्फे अभ्यासिका मिळाल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. ही अभ्यासिका आयसीएआय, न्यू दिल्ली जळगाव शाखा यांच्या सौजन्याने माजी विद्यार्थी संघटनेस मिळाली आहे.

# डॉ. सी. आर.पाटील यांचा गौरव

प्रतिनिधी । पारोळा



**येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ.सी. आर. पाटील यांना शेठ एन.एम. सायन्स कॉलेज पाटण, गुजरात येथे संपन्न झालेल्या भारतीय ज्ञानप्रणाली या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेत पोस्टर सादरीकरणामध्ये उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्काराने स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**

सदर स्पर्धेत एन्सायंट बायोलॉजिकल सायन्स अर्थात प्राचीन जीवविज्ञान या शोधनिबंधाच्या विषयावर प्राध्यापकांसाठी असलेल्या गटात पोस्टर सादरीकरणामध्ये सायंटिफिक कॉन्सिओनेस लर्नट् फ्रॉम मनुस्मृती हा शोधनिबंधाचा आशय, सादरीकरण यामुळे डॉ.सी.आर.पाटील यांचा गौरव करण्यात आला. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मोरे, सचिव पराग मोरे, संचालक व उपनगराध्यक्ष ॲड. रोहन मोरे, प्राचार्य डॉ.व्ही.आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. एस.बी. भावसार, डॉ. अजय पाटील, डॉ.जी.पी. बोरसे, तसेच प्रा.जे.बी. पाटील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# आ. चंद्रकांत पाटील यांची प्रकृती बिघडल्यामुळे मुंबईत उपचारासाठी दाखल

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरू आहे. दि.५ मार्च रोजी गुरुवारी विधानभवनात कामकाज सुरु असताना मुक्ताईनगर मतदारसंघांचे आ. चंद्रकांत पाटील यांची तब्येत अचानक बिघडली. त्यांना तातडीने एच.एन. रिलायन्स हॉस्पिटल, मुंबई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.**

यावेळी शिवसेनेचे नेते तसेच खा. डॉ. श्रीकांत शिंदे व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी रुग्णालयात जाऊन आ. चंद्रकांत पाटील यांना प्रत्यक्ष भेटून तब्येतीची विचारपूस केली. रिलायन्स हॉस्पिटलच्या डॉक्टरांना भेटून योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. एच. एन. रिलायन्स हॉस्पिटलच्या वरिष्ठ डॉक्टरांच्या देखरेखीखाली आ. पाटील यांचेवर उपचार सुरू आहेत. आता त्यांची तब्येत स्थिर असल्याचे स्वीय सहायक प्रवीण चौधरी यांनी कळविले आहे.

# पाटचारीच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे आ. किशोर पाटलांना साकडे

## पारोळा - भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिले आमदारांना निवेदन

प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील चोरवड, टिटवी, शिरसमनी तर भडगाव तालुक्यातील महिंदळे, पळासखेडे, नालबंदी येथील शेतकऱ्यांनी आ.किशोर पाटील यांना पाटचारीच्या मागणीसाठी निवेदन दिले.**



महिंदळे परिसरातून जामदा डावा कालवा वाहत असून यांचा फायदा फारच कमी शेतीला होत असल्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्र पाण्यापासून तहानलेले आहे. नालबंदी गावापासून पाटचारी काढल्यास पळासखेडे, महिंदळे, टिटवी, चोरवड, भोंडण या गावातील ५६ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन परिसरातील पाण्यावाचून तहानलेली शेती ओलिताखाली येईल. परिसराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटेल. या मागणीचे चोरवड येथील प्रगतिशील शेतकरी छोटू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाचोरा-भडगाव विधानसभेचे आमदार किशोर पाटील यांना निवेदन देऊन पाण्यावाचून तहानलेल्या शेतीसाठी पाण्याची मागणी केली. यावेळी आ.किशोर पाटील यांनी पाटचारीसाठी जलसंपदामंत्री यांची भेट घेऊन सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. जानेवारी महिन्यातच विहिरी तळ गाठतात. त्यामुळे हाती येणारी पिके वाया जातात. शेतीसाठी केलेला खर्चही निघत नसल्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस आर्थिक संकटात सापडत आहे. पाणी जवळून वाहत आहे. तरीही पिके सुकत आहेत. त्यामुळे परिसरातून पाटचारी काढल्यास दिवसेंदिवस नापिकी होत चाललेली जमीन ओलिताखाली येईल व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. पाटचारीचा दुहेरी फायदा महिंदळेपासून दोन किमी अंतरावर असलेल्या नालबंदी गावापासून पाटचारी काढल्यास पळासखेडे शिवारातून महिंदळे गावापासून जवळच टिटवी शिवारात पाचपांडव देवस्थान येथून पारोळा व एरंडोल तालुक्यासाठी वरदान ठरलेल्या अंजनी नदीचा उगम आहे. या नदीत पाणी सोडल्यास टिटवी, चोरवड, भोंडण या गावातील हजारो हेक्टर क्षेत्राला फायदा तर होणारच आहे. परंतु नदी थडीवरील अनेक गावांना या पाण्याचा फायदा होणार असून उर्वरित पाणी धारागीर धरणात जाईल. त्यामुळे धरण पुनर्भरन होण्यास दुहेरी मदत होईल, अशी मागणी केली आहे.

### राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे निकष, लाभ जाहीर करा : जुक्टो संघटना

प्रतिनिधी । जळगाव

राज्यात दि.१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय व निमशासकीय सेवेत रुजू झालेल्या शिक्षक संवर्गासह इतर सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना शासनाने जुनी पेन्शन न देता राष्ट्रीय पेन्शन योजना (एन.पी.एस.) लागू केलेली आहे. मात्र आता ह्या एन.पी.एस.धारकांना केंद्राच्या धर्तीवर दि.२० सप्टेंबर २०२४च्या वित्त विभागाच्या निर्णयानुसार सुधारित निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्राची एकीकृत निवृत्ती वेतन योजना लागू करून यापैकी एका योजनेत सहभागी होण्याची मुभा दिलेली आहे. राज्याच्या योजनेमध्ये सहभागी झाल्यास अटी, शर्ती, नियम, पात्रता, कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी वित्त विभागाला प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

# महावितरणतर्फे लाईनमन दिवस उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

महावितरणच्या जळगाव परिमंडलातील प्रकाशदीप सभागृहात दि.४ मार्च रोजी लाईनमन दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

लाईनमन डे निमित्त जळगाव परिमंडल कार्यालयात आयोजित कार्यक्रमास जळगाव मंडलचे अधीक्षक अभियंता विनोद पाटील, पायाभूत आराखडाचे अधीक्षक अभियंता मनोज विश्वासे, जळगाव परिमंडलाचे सहा. महाव्यवस्थापक महेश बुरंगे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) मानसी सुखटनकर, जळगाव मंडलाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) चेतन नंदनवार, जळगाव विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रेय साळी, जळगाव मंडलाचे व्यवस्थापक (मासं) तन्वी मोरे, यांच्यासह सर्व अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात मोटिवेशनल स्पिकर गर्णी मेमन यांनी सर्व उपस्थित जनमित्रांना मानसिक आरोग्य व कौटूंबिक स्वास्थबद्दल मार्गदर्शन केले. कॉमेडीयन श्याम जगताप यांनी आपल्या विनोदी महावितरण शैलीने उपस्थित कर्मचाऱ्यांचे मनोरंजन करत मनमुराद हसवले.